**नियमित फौजदारी खटला क्र. ३२/२०२३**
**निशाणी क्र. ५८/क सोबत**

**<u>पुढील उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री आर. डी. जुगळे यांचे मार्फत.</u>**

जत्रेला रांगेत मी, माझा भाऊ वैभव लक्ष्मण रजपूत माझी आई संगीता रजपूत, मावशी सविता जयसिंग जाधव, मामाचा मुलगा वेदांत सचिन पाटील, मामाची मुलगी वैष्णवी सचिन पाटील उभे होतो परंतू मला कोणत्या क्रमाने उभे होते सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे निलेश पाटील ने माझ्या मावशीच्या कंबरेला हात घातला हे माझी ऐकीव माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे निलेश पाटील ने माझ्या मावशीच्या कंबरेला पुन्हा स्पर्श केला हे ही माझी ऐकीव माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, हनुमान मंदीर जवळ प्रमोद पवार आणि निलेश पाटील यांचे राहते घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/०५/२०२२ रोजी हनुमान मंदीर जवळ निलेश पाटील, प्रमोद पवार व वैभव रजपुत मध्ये वादावादी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे निलेशपाटील व प्रमोद पवार सोबत हनुमान मंदीर जवळ वादावाद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस माझ्यासोबत माझे घरचेही आणि वैभव तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादावादीमध्ये वैभव ने निलेशचे कॉलर पकडले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस वैभव ने निलेश पाटीलच्या हातावर रॉडने मारहाण केले होते. हे म्हणणे खरे नाही हे की, त्यावेळेस माझा पाय लागल्यामुळे निलेश पाटील खाली पडला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस प्रमोद पवार ने त्याला उचलले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते वाद मिटविण्याकरीता यात्रा कमिटीमधील चंद्रकांत उर्फ चंद्रर पाटील वगैरे तेथे उपस्थीत होते. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रर पाटील यांनी त्यावेळेस वाद मिटविला होता. हे म्हणणे खरे नाही की, ते वाद मिटविण्याकरीता मी व माझी आई व मावशीने प्रयत्न केले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते वाद सोडविताना मला, माझ्या आईला व मावशीला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, हनुमान मंदीर जवळील भांडण सोडविताना माझा सरतपासामधील व कोर्टाच्या जबाबामध्ये वैभव काय करीत होता याला उल्लेख नाही.

हे म्हणणे खरे आहे की, धनाजी लोखंडे व संजय लोहार हे आमच्या गावातील सामाजीक कार्यकर्ते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या मावशीचे, आईचे त्याच्या सोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चंदर पाटील हे हनुमान मंदीर जवळ राहतात व तिकडचे ते सामाजीक कार्यकर्ते आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौकामध्ये झालेला वाद हा रात्रीच्या वेळेस

झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी सळी (MO1) हे बाजारामध्ये व बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, बेल्ट (MO2) हे बाजारामध्ये विकत मिळते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेत लोखंडी सळी वापरली हे दाखविण्याकरीता त्यावर कोणत्याही प्रकारचे खाणा-खुणा नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तसेच घटनेत वापरलेला बेल्ट हे दाखविण्याकरीता त्यावर कोणत्याही प्रकारचे खाणा-खुणा नाहीत. साक्षीदार स्वतहून सांगतो की, बेल्ट तुटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, लोंखडी सळी व बेल्ट आम्ही स्वतहून पोलीसांकडे दिलेला आहे.

हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौक, हे वडगांव-खोची, भादोले-मिणचे रस्ता मिळतो तेथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा कट्टा हा वडगांव खोची पूर्व पश्चिम रोडच्या उत्तर बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा कट्टा हा मिणचे-भादोले रोडच्या मध्यभागी आहे. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौकापासून मावशी व आईचे माहेर हे हकेच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौकात कोणताही वाद झाला की, तो माझ्या आईच्या माहेरी एकू येते. हे म्हणणे खरे नाही की, वैभव व निलेश पाटील मधील झालेल्या वादाबाबत निलेश पाटील हा झेंडा चौकामध्ये आम्हाला जाब विचारण्याकरीता आला होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद झाला त्यावेळेस मी व वैभव रजपूत झेंडा चौकात होतो. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौकात झेंडा कट्टाला दोन गोल पाय-या व त्याच्यावर घुमट आणि त्याच्या मधोमध लोखंडी पाईप आहे. हे म्हणणे खरे नाही की, झेंडा चौकामध्ये निलेश पाटील व रजपूत ची वादावादा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादावादावेळी झेंडा चौकामध्ये मोठा आवाज आणि आरडाओरड झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझी आई व मावशी तेथे आले होते. साक्षीदार स्वतहून सांगतो की, आम्ही सर्वजण एकत्रच होतो. हे म्हणणे खरे आहे की, निलेश व वैभवच्या वादावादीमध्ये वैभव खाली पडला होता. हे म्हणणे खरे आहे की, वादावादी सोडविण्याकरीता मी, माझी आई व मावशी मध्ये पडलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, वादावादामध्ये मला दुखापत झाली होती. तसेच माझा आईला व मावशीला ही दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, वैभव हा झेंडा चौकाच्या कट्यावर पडल्यामुळे त्याला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दंगा झाल्यामुळे लोके व इतर आरोपी जमले होते. हे म्हणणे खरे आहे की, दंगा झाल्यामुळे इतर लोके अंदाजे ५० ते ६० तेथे जमले होते. मला तेथे जमलेल्या ५० ते ६० लोकांची नावे सांगता येणार नाही. हे म्हण्णे खरे नाही की, निलेश पाटील व्यक्तीरिक्त इतर आरोपी हे दंगा व आरडाओरड झाल्यामुळे तेथे वाद मिटविण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे

नाही की, वाद मिटल्यानंतर मी माझी आई, मावशी व माझा भाऊ वैभव हे घराकडे गेले होते. हे म्हणणे खरे आहे की. पोलीस स्टेशनकडे जाण्याअगोदर व तक्रार देण्याआदी आमच्या मध्ये चर्चा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, झेंडा चौकातील वाद मिटविण्याकरीता तेथे चंद्रर पाटील व इतर यात्रा कमिटीमधील सदस्य तेथे जमले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला जाण्याआदी वैभवने कोणत्याही दवाखान्यात त्याला दुखापत होऊनही उपचार घेतले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीविरुध्द पोलीसांनी गुन्हयाची दखल घ्यावी याकरीता वैभवला दुखापत होऊनही आम्ही प्रथमता पोलीस स्टेशनला गेलो होतो.

हे म्हणणे खरे आहे की, कंबरेला हात घालणे, मागून धक्का मारणे व कंबरेला स्पर्श करणे हे वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना जाब देताना सांगीतले होते की, दर्शन झाल्यानंतर घरी जात असताना जुनी ग्रामपंचायत हनुमान मंदीरजवळ माझी मावशी सविता जयसिंग जाधवच्या कंबरेला निलेश पाटीलने हात घातला होता. परंतु सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. कोर्टामध्ये मी व माझ्या मावशीने जबाब दिलेला आहे. मी पोलीसांना जबाब देताना सांगीतले नव्हते की, पाठीमागून कोणीतरी माझी मावशी सविता हिचे कंबरेला हाताने स्पर्श केला होता. सदरचा मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबमध्ये का नमूद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोट व कंबर हे शरीराचे दोन वेगवेगळे भाग आहेत. मी सरतपासामध्ये नमूद केलेला मजकूर की, पुढे जात असताना निलेश पाटील ने पुन्हा माझ्या मावशीच्या कंबरेला स्पर्श केला हे मी पोलीसांना जबाब देताना सांगीतले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. परंतु सदरचा मजकूर माझ्या पोलीसाच्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही, माझया सरतपासातील मजकूर त्यानंतर निलेश पाटीलने माझ्या आईला बेल्ट ने डोक्यात व पाठीत मारले होते हे मी पोलीसांना जबाब देताना सांगीतले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना जबाब देताना निलेश पाटील ने माझी मावशी सविता हिला बेल्टने पाठीत व डोक्यावर मारहान केल्याचे सांगीतले होते. माझ्या सरतपासामध्ये माझा आईला मारल्याचे नमूद का आहे यांचे कारण मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की, निलेश पाटील ने माझ्या मावशीच्या कंबरेला हात घातला हे मी कोर्टामध्ये जबाब देताना सांगीतले होते. परंतु सदरचा मजकूर माझ्या कोर्टाच्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. **(अभियोग पक्षातर्फे वकीलांनी**

**सदर साक्षीदारांचे फौजदारी प्रकिया संहीता कलम १६४ खाली जबाबास निशाणी देण्यास विनंती केली आहे. त्यास आरोपीचे वकील यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १४५ नुसार साक्षीदाराचे म्हणणे Contradict करण्याकरीता त्याचा कोर्टातील जबाब त्याला दाखविण्याचे गरजेचे नाही असे सांगीतले आहे त्यामुळे त्यास निशाणी देता येणार नाही. त्यावर आरोपीचे वकीलांनी नामदार सर्वोच्च न्यायालयाचाचे केस लॉ दाखल करणार आहे असे सांगून सदर उलटतपास तहकूब करण्यास विनंती केली आहे.)**

आरोपीचे वकीलांचे विनंतीनुसार पुढील उलटतपास तहकुब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृती

sd/-

(आर.एस.मोरे)

दि. ०५/०१/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव

(सरकारी वकील व आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीच्या वकीलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ ***Alauddin and Ors Vs. The State Of Assam and Anr. reported in Criminal Appeal No. 1637/2021*** हा न्यायनिर्णय दाखल केला आहे. न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. सदर साक्षीदाराचे फौजदारी प्रक्रिया संहिंता कलम १६४ खाली दि. १५/०६/२०२२ रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव यांनी नोंदविले आहे. म्हणून नोंदवलेल्या विधानाला पावित्र्य आहे. तसेच, भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ८० नुसार असे गृहीत धरले जाते की, कागदपत्रे खरे आहेत आणि ज्या परिस्थितीत ते स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीने केले आहे त्या परिस्थितीबद्दलचे विधान खरे आहे आणि योग्यरित्या घेण्यात आले आहे. तथापि, विरोधाभास (contradiction) सिद्ध करण्यासाठी आधी दिलेले विधान रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे. विरोधाभास (contradiction) सिद्ध करण्यासाठी आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिंता च्या कलम १६४ अंतर्गत साक्षीदाराने दिलेल्या जबाबावर उलटतपास घेण्याचे स्वातंत्र्य आहे. म्हणून, आरोपीच्या वकीलांनी घेतलेला आक्षेप फेटाळण्यात येत आहे.) व सदर जबाबास निशाणी क्र.६३ देण्यात येते. (साक्षीदाराने पुढील तारखेस उलटतपासाकरिता हजर राहावे.)

**दिनांक - ११/०२/२०२६**